## ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून येण्यास आवश्यक निकष :-

### महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 13 मधील तरतूदींनुसार :-

1) ज्या व्यक्तीचे वय प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीसाठी किंवा पोट-निवडणुकीसाठी नामनिर्देशन करण्याकरिता निश्चित केलेल्या अंतिम तारखेस 21 वर्षापेक्षा कमी नसेल, अशा व्यक्तीला ग्रामपंचायत निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे राहता येईल.

2) ग्रामपंचायत निवडणूकीस उभ्या असलेल्या उमेदवाराचे नांव त्या गावच्या मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे. एखादया गावाचे मतदारांचे यादीत नाव नसलेल्या इसमास, त्या गावाचे कोणत्याही वॉर्डात उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

3) त्या गावाचे मतदारांचे यादीत नाव असलेल्या इसमास त्या गावातील एकापेक्षा जास्त प्रभागात (वॉर्डात) एकाच वेळी उमेदवार म्हणून उभे राहता येते. ज्या प्रभागात मतदार म्हणून त्याचे नांव आहे, त्याच प्रभागात त्याने उभे राहिले पाहिजे असे त्यांच्यावर बंधन नाही.

4) एकाचवेळी एकापेक्षा जास्त कारणांसाठी अपात्र असलेला इसम त्या सर्व अपात्रतांची मुदत संपल्यानंतर निवडणुकीस उभा राहू शकतो.

5) दोन प्रभागातून निवडून आल्यास क. 13 अ प्रमाणे मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, 1959 मधील नि. 41-अ प्रमाणे उमेदवाराने निवडणूक निकालापासून 7 दिवसांचे आत त्यापैकी एकाशिवाय बाकीचे जागांचे राजीनामे दिले पाहिजेत व तसे नोटिशीचे सदर मुदतीत निवडणूक अधिकाऱ्यास कळविले पाहिजे; त्याने मुदतीत राजीनामे पाठविले नाहीत तर तो कोणत्याच प्रभागातून निवडून आला नाही असे समजले जाईल.